हत्तीबेट, देवर्जन ता. उदगीर, जि. लातूर या पर्यटनस्थळास 'ब' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक टिडीसी २०१८/३/प्र.क्र.२०३/ पर्यटन,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२०.

**संदर्भ** :- १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. टिडीएस २०१०/८/प्र.क्र.४६३/पर्यटन, दि.४/११/२०१०.
२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. टिडीएस २०११/१२/प्र.क्र.८५५/पर्यटन, दि.१६/१/२०१२.
३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. टिडीएस २०१६/११/प्र.क्र.८६२/पर्यटन, दि.२५/४/२०१७.
४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे पत्र क्र. मपविम/विकास/हत्तीबेट-ब वर्ग/३/प्र.क्र.८१/२०१८/२५८, दि.१९/१/२०१९.
५) जिल्हाधिकारी, लातूर यांचे पत्र क्र. २०१८/ नियोजन/ -ब॰ दर्जा/ पर्यटन/प्रस्ताव/१५९७/, दि.२४/७/२०१८.
६) जिल्हाधिकारी, लातूर यांचे पत्र क्र.२०१८/पर्यटन/सुविधा/कक्ष-४/२४८०, दि.६/१२/२०१८.

**प्रस्तावना :**

जिल्ह्यातील "ब" वर्ग पर्यटनस्थळांची निवड करुन प्रस्ताव शासनाला सादर करण्याबाबतचे अधिकार संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये, संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयामधील जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस प्रदान करण्यात आले आहेत. तसेच राज्यातील "ब" वर्ग पर्यटनस्थळ घोषित करण्यासाठी निकष व कार्यपध्दती संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे.

१ हत्तीबेट हे श्री सदगुरु गंगारामबुवा महाराज यांची संजीवन समाधी असलेले व पुरातत्व लेण्यांसाठी प्रसिध्द असलेले ऐतिहासिक ठिकाण असून सदर स्थळास लाखो पर्यटक भेट देतात. गेल्या ३ वर्षात जवळपास सरासरी ९ ते १० लक्ष पर्यटकांनी सदर स्थळास भेट दिली आहे.

२ सदरचे ठिकाण हे हैद्राबाद मुक्ती संग्रामात महत्वाचे स्थान होते. मुक्ती संग्रामामध्ये निजाम संस्थानाविरुध्द स्थानिक परिसरातील लोकांनी हत्तीबेटचा किल्ल्यासारखा वापर करुन निजामांशी झुंज देऊन मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये महत्वाचे योगदान दिले.

३ या बेटावर ६ व्या शतकातील लेण्यांचे अस्तित्व असून गंगाराम महाराज संजिवन समाधी ही ६० वर्षापूर्वीची असल्याच्या नोंदी आहेत. सदरचे पर्यटन स्थळ हे मौजे देर्वजन (हणमंतवाडी), मौजे करवंदी ता. उदगीर व मौजे धर्मापूरी ता. देवणी या दोन्ही तालुक्यांच्या व तिन्ही गावांच्या हद्दीवर असणारे ठिकाण आहे. या पर्यटन स्थळास 'क' वर्ग पर्यटनस्थळ घोषित करण्यात आले आहे.

४. जिल्हाधिकारी, लातूर यांनी संदर्भ क्रमांक ५ येथील दि.२४/७/२०१८ च्या पत्रान्वये हत्तीबेट (देवर्जन), ता. उदगीर,जि. लातूर या पर्यटनस्थळास 'ब' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याची शिफारस केली आहे. तसेच व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांनीही संदर्भ क्रमांक ४ येथील दि.१९/१/२०१९ च्या पत्रान्वये सदर स्थळास 'ब' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार हत्तीबेट, देवर्जन, ता. उदगीर, जि. लातूर या स्थळास पर्यटनस्थळाचा 'ब' वर्ग दर्जा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

**"हत्तीबेट,देवर्जन ता. उदगीर, जि. लातूर" या पर्यटनस्थळास** दरवर्षी सुमारे ९ ते १० लक्ष पर्यटक भेट देतात. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. टिडीएस २०१६/११/प्र.क्र.८६२/पर्यटन, दि.२५/४/२०१७ अन्वये राज्यातील 'ब' वर्ग पर्यटनस्थळे घोषित करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या निकष व कार्यपध्दती नुसार सदर ठिकाण "ब" वर्ग पर्यटनस्थळ घोषित करण्यास शासन याव्दारे मान्यता देत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२००३०३१२५९५६९३२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ramesh Jayaram Kadam

Digitally signed by Ramesh Jayaram Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=931a917c29ea693ba9abee543d58bf1b6ade60ae69c9be92f59d232bb3a3fcc8, serialNumber=c8fbeb4e149e205d858dabb5d81a2a90a8deb719257572300ef79cfab47d9345, cn=Ramesh Jayaram Kadam
Date: 2020.10.13 15:14:54 +05'30'

**(र. ज. कदम)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्राचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद
६) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा
१३) विभागीय आयुक्त, पुणे.
१४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
१५) संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१६) जिल्हाधिकारी, लातूर.
१७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

७) सर्व मा. विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद
८) सर्व मा. विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानसभा
९) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव
१०) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव
११) अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
१२) प्रधान सचिव (पर्यटन) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा जिल्हा पर्यटन समन्वय अधिकारी, लातूर
१९) नियोजन विभाग, मंत्रलाय, मुंबई.
२०) वित्त विभाग, मंत्रलाय, मुंबई.
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२२) जिल्हा नियोजन अधिकारी, लातूर
२३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाची सर्व कार्यासने
२४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
२५) निवड नस्ती, पर्यटन

***